१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५ (१)
२) आदेश क्र.नासुकें/१/कावि/७०५/२०१३ दि.०६/११/२०१३
३) आदेश क्र.नासुकें/१/कावि/१६०/२०१७ दि.२०/०५/२०१७
४) आदेश क्र.प्रशा/२/कावि/४२२/२०१७ दि.०१/०८/२०१७
५) बांधकाम विभागाकडील दि.२६/०९/२०१७ चा प्रस्ताव.

---

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुकें/१/कावि/५४५ /२०१७
दिनांक : २९/१२/२०१७

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५**
**जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करणेबाबत...**
**(बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग)**

**आदेश**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१) व १९ (१) मधील तरतुदींनुसार वाचले क्र.२ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विविध विभागांसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आलेले आहेत. वाचले क्र.३ चे आदेशान्वये बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग मुख्य कार्यालयासाठी तसेच अ,ब,क,ड,ई,फ या क्षेत्रीय कार्यालयातील बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागासाठी जन माहिती अधिकारी म्हणून संबंधित कार्यक्षेत्राचे उपअभियंता यांना व प्रथम अपिलिय अधिकारी म्हणून संबंधित कार्यक्षेत्राचे कार्यकारी अभियंता यांना पदनिर्देशित करणेत आले आहे.

तथापि, वाचले क्र.४ चे आदेशान्वये महापालिका क्षेत्रातील प्रभाग रचनेत बदल करण्यात आला असून ग व ह असे दोन प्रभाग नव्याने स्थापन करण्यात आले आहेत. बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे काम हे प्रभागनिहाय चालत असलेने त्यानुसार विभागप्रमुखांनी केलेल्या कामकाज वाटपानुसार उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांचेकडे सोपविलेल्या नवीन कार्यक्षेत्रानुसार बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण मुख्य कार्यालयासाठी व अ,ब,क,ड,ई,फ तसेच ग व ह या नव्याने स्थापन झालेल्या क्षेत्रीय कार्यालयातील बांधकाम विभागासाठी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करणे गरजेचे आहे.

सबब, बांधकाम विभागाकडील कार्यालयीन प्रस्तावानुसार माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने पार पाडावे व नागरिकांना माहिती शिघ्रतेने उपलब्ध व्हावी या उद्देशासाठी आणि अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, बांधकाम विभागाकडील कामकाज वाटपानुसार मुख्य कार्यालय तसेच अ,ब,क,ड,ई,फ,ग व ह या क्षेत्रीय कार्यालयातील बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागासाठी संबंधित कार्यक्षेत्राचे उपअभियंता यांना जनमाहिती अधिकारी व संबंधित कार्यक्षेत्राचे कार्यकारी अभियंता यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

२...

संबंधित अधिकारी यांची प्रशासकीय बदली झाल्यास / पद रिक्त असल्यास, बदली झालेल्या किंवा अतिरिक्त पदभार सोपविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्या पदास पदनिर्देशित केल्याप्रमाणे कामकाज करावे. कामकाज बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे पद रिक्त राहिल्यास विभागप्रमुख, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांनी माहितीच्या अधिकाराची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना व कार्यवाही आपल्या स्तरावर करावी व त्याबाबत नागरी सुविधा केंद्रास अवगत करावे.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / संबंधित अधिकारी,
मुख्य कार्यालय,
बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग,

अ,ब,क,ड,ई,फ,ग,ह क्षेत्रीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत,

माहिती व तंत्रज्ञान विभाग.
२/- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने मनपा वेबपोर्टलवरील माहिती अद्ययावत करावी.

प्रशासन अधिकारी,
नागरी सुविधा केंद्र
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.